

# -: श्री. साईबाबा :-

''जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'' या तत्वाची अनुभूती देणारा अवतार म्हणजे शिर्डी क्षेत्रात झालेला "श्री साईनाथांचा" अवतार.

परमेश्वराची खरी ओळख आपल्या आचरणातून श्री साईबाबांनी दिली. आपण परमेश्वराचे अवतार नसून परमेश्वराचे सेवक आहोत असे बाबा नेहमी सांगत असत.

"माणसाने माणसाशी आपुलकीने वागावे, एकमेकांचा आदर करावा, परमेश्वरावर श्रद्धा ठेवून प्रत्येक वेळी सबुरी म्हणजेच धैर्य ठेवावे. श्रद्धा आणि सबुरी यावर यश अवलंबून असते" अशी शिकवण त्यांनी सर्वांना दिली.

आपापसात वैमनस्य न ठेवता, भेदभाव न ठेवता, सर्व समावेशक राहून सर्वांचा ईश्वर हा सत्ताधारक असून आपण ईश्वराची लेकरं आहोत हे कृतीतून दाखवून ''सबका मालिक एक'' हा मंत्र दिला.

सुरुवातीला एक भुयार दाखवून, भुयारात जपमाळ, गोमुखी आसन व एक दिवा दाखवला व वेष फकिराचा धारण केला होता. म्हणजेच ना हिंदू ना यवन असा सर्वसमावेशक अवतार

धारण केला. फकीराच्या वेषात खंडोबाच्या मंदिरात जाऊन म्हाळसापती यांच्याकडून "या साई" या उच्चाराने स्वागत स्वीकारले व "साईबाबा" म्हणून नाव धारण केले.

करतळभिक्षा पाच घरा । तरुतत्त्वास अष्टौप्रहरा ।।

असे वर्णन श्री साईबाबांचे श्री. दाभोलकर साईचरित्रकाराने केले. निंबवृक्षाखाली प्रकट होऊन मशिदीला "द्वारकामाई" नाव संबोधिले.

पाळणामध्ये रात्रभर दिवे तेवत ठेवणे, अखंड धुनी तेवत ठेवणे, धान्याचे पोते, घंटा, जाते, कोळंबा (भिक्षापात्र) आदी संग्रह करून "अल्लाह मालिक" सतत शब्दोच्चाराबरोबर नानासाहेब चांदोरकरांना "तव्दिध्दी प्रणिपातेन" या गीतेचा अर्थ सांगणे या लीला बाबांनी द्वारकामाई मंदिरात केल्या.

सर्व भक्तांना कर्म सिद्धांत शिकवला, उपासना करण्यास लावले, गुरुचरित्र, अध्यात्म रामायण, एकनाथी भागवत, श्रीमद् भगवद्गीता वाचण्यास सांगितले. ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महत्त्व विशद केले. श्रीकृष्ण, प्रभू रामचंद्र यांचे जन्मोत्सव साजरे करून परंपरेचे पालन करावे व व्यवहारात कसे वागावे हे ज्ञान हे स्वतः आचरण करून भक्तांना दिले.

पांडुरंग परमात्म्याचे दर्शन श्री दासगणू महाराजांना घडवून निज पायांशी गंगा यमुना प्रकट केल्या व प्रयागाचे दर्शन घडवले. भुकेल्या श्वानांना भाकरी घालून "अहं वैश्वानरो भुक्त्वा" या गीतेतील श्लोकाचा अर्थ कृतीतून भक्तांना दाखवला.

परंपरा जपून नित्य व्यवसायाबरोबर ईश्वरनिष्ठा बाळगावी व मनचंचलता न दर्शवता धैर्यशील रहावे, भेदाभेद करू नये, सर्वांना समान न्याय द्यावा ही शिकवण साईबाबांनी दिली. एक पंडित्य वक्त्यापेक्षा एक क्रियावंत श्रेष्ठ असतो. हे आचरण शुद्धता असलेले श्री संत साईबाबा कलियुगातील दत्तअवतारच आहेत असा उल्लेख "श्रीपाद श्रीवल्लभ" चरित्रात आढळून येतो.

- श्री. स्वप्नील जोशी.

व्यक्तिरेखा -

१. साईबाबा - श्री. सुनील परदेश.

२. गावचा पाटील - श्री. ओमकार पाटील.

३. बायजा अक्का - सौ. पूजा पेंढारकर.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. आमित पाटील.
४. श्री. महेश पुजारी.
५. श्री. ओमकार पाटील.
६. श्री. कल्पेश पाटसकर.
७. श्री. आशुतोष गोळे.
८. सौ. आसावरी पंडित.
९. श्री. गिरीश कुलकर्णी.
१०. श्री. सर्वेश उमराणी.
११. श्री. के. एन. देसाई सर.

लोकेशन -

कृष्णाबाई मंगल कार्यालय, सोमवार पेठ कराड.

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. शंतनू देशमुख.

२. श्री. अद्वैय मुंढे.

३. श्री. आमित पाटील.

४. श्री. महेश पुजारी.

५. श्री. ओमकार पाटील.

६. श्री. सर्वेश उमराणी.

७. श्री. गणेश सावंत.

८. श्री. के. एन. देसाई सर.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - श्री. स्वप्नील जोशी.
- लेख संकलन -

  -श्री. दीपक आफळे.
- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -